**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २८ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा राज्य सरकारचा निर्णय**
2. **खतांची दरवाढ तात्काळ कमी करून शेतकऱ्यांना सबसिडी देण्याची माजी मंत्री अनिल देशमुख यांची मागणी**
3. **कामठीच्या एकाच कुटुंबातील तिघांचा वरूड-मोर्शी राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात मृत्यू**
4. **मोबाईल ॲप "Census 2027-HLO" आणि ऑनलाइन पोर्टलद्वारे राज्यात स्वयं-गणना १ मे ते १५ मे या कालावधीत होणार**

**प्रताप सरनाईक**

मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा किंवा त्यांचा परवाना रद्द न करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या चालकांना मराठी शिकवण्यासाठी १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान मोहिम राबवली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. परिवहन विभागातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यावर ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

या कालावधीत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या, प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या, तसंच नियमांचं उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई केली जाईल, त्यांचा परवानाही रद्द केला जाऊ शकतो असं सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**अनिल देशमुख**

खतांच्या वाढत्या किमतीमुळे राज्यातील शेतकरी संकटात सापडले असून दरवाढ तात्काळ कमी करून सबसिडी द्यावी, अशी मागणी माजी मंत्री अनिल देशमुख यांनी केली आहे. खतांच्या किमतीत २५ते ८५ टक्क्यांपर्यंत झालेल्या दरवाढीबद्दल त्यांनी सरकारवर टीका केली आहे. डीएपी आणि युरियासोबत इतर उत्पादने 'लिंक' करून विक्री केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात खत कंपन्यांवर कारवाई

न करता विक्रेत्यांनाच लक्ष्य केल्याचीही त्यांनी टीका केली. सरकारने दर कमी करून विक्रेत्यांना दिलासा द्यावा आणि संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली आहे

**शेतकरी आंदोलन**

धान पिकाला बोनस देण्यात यावा, थकीत चुकारे तत्काळ अदा करण्यात यावेत तसेच धान खरेदीचे उद्दिष्ट वाढविण्यात यावे या प्रमुख मागण्यांसह एकूण 14 मागण्यांसाठी गोंदियातील धान उत्पादक शेतकरी संघटनेच्या वतीने 15 एप्रिलपासून साखळी उपोषण सुरू करण्यात येत आहे. काल  अर्जुनी/मोरगाव दौऱ्यावर आलेले काँग्रेसचे नेते आमदार नाना पटोले, आणि खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी उपोषण स्थळाला भेट देऊन शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. तसच शासनाने तातडीने याची दखल घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणीही त्यांनी केली.

**संजय गायकवाड**

कोल्हापूरातले प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाणा पोलिसांनी स्थानबद्ध केलं आहे. शिवाजी कोण होता? या  पुस्तकाच्या शीर्षकावरून आमदार संजय गायकवाड यांनी शिवीगाळ तसंच धमकी दिल्याच्या निषेधार्थ बुलढाणा इथं आंदोलन करण्यासाठी ते निघाले असता चिखली येथेच पोलिसांनी त्यांना अडवलं. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट तसंच इतर पुरोगामी संघटनांचे कार्यकर्ते सकाळीच बुलढाण्यामधे जिजामाता मैदानावर एकत्र जमले. दुसरीकडे संजय गायकवाड यांचे समर्थकही मोठ्या संख्येने या ठिकाणी जमल्यामुळे दोन्ही बाजूंनी घोषणाजी सुरू होऊन तणावाचं वातावरण निर्माण झालं, त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध केलं आहे.

**भीषण अपघात**

अमरावती जिल्ह्यातील वरूड-मोर्शी राष्ट्रीय महामार्गावर खडका फाट्याजवळ आज भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. यात ३ वर्षाच्या बालिकेचा समावेश आहे. मूळचे नागपूर जिल्ह्यातील कामठी भागात राहणाऱ्या नांदे कुटुंबियातील ६२ वर्षीय समाधान नांदे, २८ वर्षीय किरण नांदे आणि तीन वर्षांची दिया नांदे यांचा मृत्यू झाला तर ३४ वर्षीय गोपाल नांदे गंभीर जखमी झाले आहेत. नागपूरहून लग्नसमारंभासाठी जात असताना त्यांच्या वाहनाची रस्त्याकडील झाडाला जोरदार धडक

बसली. यापैकी एकाचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस तपास करत आहेत.

**महत्वाची सूचना**

आकाशवाणी नागपूर केंद्राच्या 585 किलो हर्ट्स आणि विविध भारती नागपूर केंद्राच्या शंभर पूर्णांक सहा मेगाहर्टसवरून दररोज सायंकाळी ६ वाजता प्रसारित होणारे प्रादेशिक बातमीपत्र दिनांक एक मे 2026 पासून सहा वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल. त्याचप्रमाणे विविध भारतीच्या नागपूर केंद्रावरून सायंकाळी सहा वाजून 15 मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या ठळक बातम्या 1 मे पासून सायंकाळी सहा वाजून 58 मिनिटांनी प्रसारित केल्या जातील.

**लैंगिक छळ प्रतिबंध**

महिलांवरील अत्याचाराला आळा बसावा यासाठी राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. असे न केल्यास 50  हजार रुपयांपर्यंत दंड तसच पुनरावृत्ती झाल्यास दंड वाढविणे, परवाना रद्द करणे यासारखी कडक कारवाईही करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त जगदीश मिनियार यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिली आहे.कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम 2013 अर्थात पॉश ॲक्ट ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत. या पार्श्वभूमीवर 10 किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या सर्व कार्यालये, संस्था, संघटना, आदी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन करणे आवश्यक आहे. खासगी आस्थापनांनी केंद्र शासनाच्या SHE Box Portal वर नोंदणी करून त्यांच्या अंतर्गत समितीची माहिती ऑनलाईन अपलोड करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**जनगणना २०२७**

जनगणना २०२७ प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्यात व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे. यंदा प्रथमच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने जनगणना पार पडणार आहे. या प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणजे घर नोंदणी आणि गृहनिर्माण जनगणना हा १६ मे ते १५ जून २०२६ दरम्यान राबवण्यात येणार आहे. त्याआधी स्वयं-गणना टप्पा १ मे ते १५ मे  या कालावधीत पार पडणार आहे. नागरिकांसाठी विशेष मोबाईल ॲप

“Census 2027-HLO” तसंच स्वतंत्र ऑनलाइन पोर्टलची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**मेळघाट जलसंकट**

तापमानात वाढ झाल्याने चिखलदरा तालुक्यातील आठ गावांमध्ये सध्या १९ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. या गावांमध्ये भूगर्भात पाण्याचा कोणताही स्रोत उपलब्ध नसल्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसल्याचं जिल्हा परिषद प्रशासनानं म्हटलं आहे. पाणीपुरवठा विभागाने तयार केलेल्या टंचाई उपाययोजनांच्या आराखड्यानुसार, उन्हाळ्याच्या चार महिन्यांत १५ गावांमध्ये टँकर किंवा बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते. यासाठी सुमारे ३० लाख रुपये खर्चाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**घागर मोर्चा**

भंडारा जिल्ह्याच्या तुमसर शहरात अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी येत नसल्याने आणि काही ठिकाणी अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांनी नगरसेविका रोशनी भोंडेकर यांच्या नेतृत्वात नगर परिषदेवर घागर जन आक्रोश मोर्चा काढला. शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची सोडवण्यासाठी सुवर्ण जयंती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत संपूर्ण शहरात नवीन पाईपलाईन टाकण्यात आली. तरीही नागरिकांना पुरेसं पाणी उपलब्ध होत नसल्याने हा निषेधात्मक मोर्चा काढण्यात आला.

**ग्रामपंचायत निवडणूक**

भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमधील रिक्त सरपंच आणि सदस्यपदांसाठी आज निवडणूक होत आहे.५३ रिक्त जागांसाठी ८७ उमेदवार आपले नशीब आजमावित आहेत. प्रत्यक्षात ७३ जागांसाठी ६३ ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक होणार होती. मात्र २१ ठिकाणी बिनविरोध निवड झाल्याने आता ५३ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. १३ ठिकाणी सरपंचपदासाठी थेट जनतेमधून निवड होणार असल्याने सबंधित गावांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रत्नागिरीच्या चार तालुक्यांतल्या १३ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी देखील आज मतदान होत आहे.

**रेल्वे फलाट स्थानक बदल**

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई इथं सुरू असलेल्या पुनर्विकास कामांमुळे प्लॅटफॉर्म १ आणि १७ वरील ट्रॅफिक ब्लॉकची मुदत १०८ दिवसांपर्यंत

वाढवण्यात आली असून आगामी १७ मे पर्यंत हा बदल लागू राहणार आहे. यामुळे हावडा-सीएसएमटी एक्सप्रेस आता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ऐवजी दादर इथं थांबेल.दरम्यान, गोंदिया स्थानकावरील कामांमुळे ३ ते २३ मे दरम्यान मुंबई-गोंदिया-मुंबई विदर्भ एक्सप्रेस गोंदिया ऐवजी नागपूरजवळील अजनी रेल्वे स्टेशन येथून सुरू आणि समाप्त होणार आहे.

**विद्यापीठ आंदोलन**

विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील कर्मचारी राज्य शासनाविरुद्ध १८ मे पासून साखळी आंदोलन सुरू करणार आहेत. 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'चे अध्यक्ष अजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जळगाव इथं झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**हवामान**

विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये उन्हाचा तडाखा कायम असून आजही अकोला, अमरावती, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेसह विजांचा कडकडाट आणि वादळ येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उद्या आणि परवा विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं असं नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने कळवलं आहे. दरम्यान आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार विदर्भात वर्धा जिल्ह्यात सर्वाधिक 45 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची तर अकोला, अमरावती, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये 44 अंश सेल्सिअस पेक्षा अधिक तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

**आयपीएल क्रिकेट**

इंडियन प्रिमियर लीग - आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. चंदिगढ इथं संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

*******